पुरोगामी विचाराचे

एकमत

page- 3
10 Oct 2024

# येडशी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**येडशी : प्रतिनिधी**

धाराशिव तालुक्यातील येडशी येथील जिल्हा परिषद शाळेत सायबर शिक्षा सायबर सुरक्षा अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागातील वैष्णवी पाटील या विद्यार्थीनींने आजच्या ऑनलाईन युगात कशी फसवणूक केली जाते, याची माहिती सांगून दक्षता घेण्याविषयी माहिती दिली. तसेच अनोळखी व्यक्तींना ओटीपी सांगू नये, अनोळखी फोन स्वीकारु नयेत, सोशल मिडीया वरील लिंक व मेसेजची पडताळणी करावी अशी माहिती सांगितली. यावेळी जिल्हा परिषद मुलांची शाळा, कन्या शाळा, उर्दू शाळा येथील विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.